सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरीता वाहन कर अनुदानाकरीता " दुसरे वितरण " ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्कमा देणे- भारीत- मागणी क्रमांक एल-५ मुंबई वाहनांवरील कर अधिनियम १९५८ मधील कलम ११(२) अन्वये भूतपूर्व जिल्हा स्थानिक मंडळांना देय असलेली वाहनांवरील करापोटी भरपाईची रक्कम संबधीत जिल्हा परिषदांना देणे. (३६०४०२९२)

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीजीटी -२०१५/प्र.क्र.४३ /वित्त-३

बांधकाम भवन,मर्झबान रोड,

फोर्ट-१,मुंबई-४००००१.

तारीखः **१९ जानेवारी,२०१६.**

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५.

२) शासन निर्णय क्रमांकः बीजीटी -२०१५/प्र.क्र.४३/वित्त-३, दिनांक -१४/५/२०१५.

३) शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दि.१२ जानेवारी,२०१६.

शासन निर्णय:-

मुंबई मोटार वाहनावरील कर अधिनियम १९३५ मधील कलम ९ आणि मुंबई मोटार वाहनांवरील कर अधिनियम १९५८ (ज्यायोगे १९३५ चा अधिनियम रद्द करण्यांत आला) मधील कलम ११ च्या तरतूदीनुसार भूतपूर्व जिल्हा स्थानिक मंडळांना काही ठराविक भरपाईच्या देय असलेल्या रकमा महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ मधील कलम २८८ नुसार त्या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ११ च्या परिच्छेद २(अ) व (ब) अन्वये उत्तराधिकारी संस्था म्हणून संबंधित जिल्हा परिषदांना देय आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदांना वाहनांवरील करापोटी भरपाईची रक्कम देता यावी म्हणून सन २०१५-२०१६ या चालू वित्तीय वर्षी रु. ५,४४,०००/- (रुपये पाच लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त) एवढया रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

२. वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३,दिनांक १७ एप्रिल,२०१५ अन्वये आवश्यक असणारा योजनेतर अर्थसंकल्पीत निधी ७०% च्या मर्यादेत वितरण करण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार सदर तरतुदीपैकी माहे एप्रिल २०१५ ते नोव्हेंबर, २०१५ या आठ महिन्याकरीता रु. ३,८०,८००/- (रुपये तीन लक्ष ऐंशी हजार आठशे फक्त) एवढया रकमा या शासन निर्णयाव्दारे संबधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त देण्यात आल्या आहेत.

३. आता वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१२ जानेवारी,२०१६ अन्वये अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ८५% एवढी विहीत करण्यांत आली आहे. त्यास अनुसरून उर्वरीत कालावधीसाठी मोटार वाहनावरील कर (३६०४ ०२९२) या वरील अनुदानासाठी रु. ८१,६००/- (रुपये एक्याऐंशी लक्ष सहाशे फक्त) एवढे अनुदान आता वितरीत करण्यांत येत आहे. अशाप्रकारे आतापर्यंत मोटार वाहनावरील कर (३६०४ ०२९२) रु. ४,६२,४००/- (रुपये चार लक्ष बासष्ट हजार चारशे फक्त) वितरीत करण्यांत येत आहे.

४. या शासन निर्णया सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

५. या बाबीवर होणारा खर्च ग्रामविकास व जलसंधारण विभाग मागणी क्र. एल-५, ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्कमा देणे- भारीत-१०५ वाहनांवरील कर (३६०४०२९२) या लेखाशीर्षाखाली दाखवावा व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षासाठी अधिनस्त ठेवलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.

६. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदांना मंजूर केलेल्या उपरोक्त लेखाशीर्षाखाली खर्ची पडलेल्या रकमेबाबतची माहिती शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन १०८९/सीआर ३०२७/२८, दि. ५ सप्टेंबर, १९९० ला जोडलेल्या विहीत प्रपत्रात भरुन या कार्यासनास पाठवावी.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दिनांक १२ जानेवारी,२०१६ अनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१६०११९१५३६२९३५२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.20 11:33:58 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्रशासन.

प्रत,

१. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक व पुणे विभाग.
२. सहाय्यक आयुक्त विकास कोकण, नाशिक व पुणे विभाग.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परिक्षा) मुंबई (५ जादा प्रतींसह).
४. महालेखापाल , महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई (५ जादा प्रतींसह).
५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा ठाणे, रत्नागिरी, सिधुदुर्ग, रायगड, नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रत्नागिरी, सिधुदुर्ग, रायगड, नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, नाशिक,जळगांव,धुळे,नंदुरबार, अहमदनगर, पुणे,सातारा,सांगली,सोलापूर व कोल्हापूर.
८. मुख्य लेखा परिक्षक व स्थानिक निधी लेखा,कोकण भवन,बेलापूर,नवी मुंबई,
९. उप मुख्य लेखा परिक्षक व स्थानिक निधी लेखा कोकण ,पुणे विभाग.
१०.वित्त विभाग (का.क्र.व्यय १५, बीयुडी १६ अर्थोपाय) ,मंत्रालय, मुंबई.
११.कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-७, वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई .
१२.निवड नस्ती का.क्र.वित्त-३, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

विवरण पत्र

मुंबई वाहनांवरील कर अधिनियम १९५८ मधील कलम ११(२) अन्वये भूतपूर्व जिल्हा स्थानिक मंडळांना देय असलेली वाहनावरील करापोटी भरपाईची रक्कम संबंधित जिल्हा परिषदांना देणे बाबत **"दुसरे वितरण".** (शासन निर्णय क्रमाक : बीजीटी-२०१५/ प्र.क्र.४३ /वित्त-३,दिनांक : १९ जानेवारी,२०१६)

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हयाचे नांव	सन २०१५ या वितीय वर्षासाठी मंजूर तरतूद रकमा	शासन निर्णय दि. १४/५/२०१५ अन्वये मंजूर करण्यात आलेले एकूण अनुदान	शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेले एकूण अनुदान	अक्षरी (रुपये)	या शासन निर्णया पर्यंत वितरीत केलेले एकूण अनुदान
१	२	३	४	५	६	७
१	ठाणे	११३४४४	७९४११	१७०१७	रुपये सतरा हजार सतरा फक्त	९६४२८
२	रायगड	२३५४३	१६४८०	३५३१	रुपये तीन हजार पाचशे एकतीस फक्त	२००११
३	रत्नागिरी	११२२४	७८५७	१६८४	रुपये एक हजार सहाशे चौऱ्याऐंशी फक्त	९५४१
४	सिंधुदुर्ग	६१२३	४२८६	९१८	रुपये नऊशे अठरा फक्त	५२०४
५	नाशिक	१८४८५	१२९४०	२७७३	रुपये दोन हजार सातशे त्र्याहत्तर फक्त	१५७१३
६	धुळे	३६९५	२५८७	५५४	रुपये पाचशे चौपन्न फक्त	३१४१
७	नंदुरबार	३०२३	२११६	४५३	रुपये चारशे त्रेपन्न फक्त	२५६९
८	जळगांव	६७१०४	४६९७३	१००६६	रुपये दहा हजार सहासष्ट फक्त	५७०३९
९	अहमदनगर	१७१७२	१२०२०	२५७६	रुपये दोन हजार पाचशे शहात्तर फक्त	१४५९६
१०	पुणे	११५३२	८०७२	१७३०	रुपये एक हजार सातशे तीस फक्त	९८०२
११	सातारा	१४८७६	१०४१३	२२३१	रुपये दोन हजार दोनशे एकतीस फक्त	१२६४४
१२	सांगली	१३१६५	९२१६	१९७५	रुपये एक हजार नऊशे पंच्याहत्तर फक्त	११९११

१३	सोलापूर	३३६०२	२३५२१	५०४०	रुपये पाच हजार चाळीस फक्त	२८५६१
१४	कोल्हापूर	२०७०१२	१४४९०८	३१०५२	रुपये एकतीस हजार बावन्न फक्त	१७५९६०
१५	**एकूण**	**५४४०००**	**३८०८००**	**८१६००**	**रुपये एक्याऐंशी हजार सहाशे फक्त**	**४६२४००**

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.20 11:34:29 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.